Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X
Available online at www.ror.isrj.in

ORIGINAL ARTICLE

# संविधान पुनर्विलोकन व राष्ट्रीय आयोगाच्या शिफारसी

**देवलाल सुखदेवराव आठवले**

श्रीमती को.गा.म.महा.दर्यापूर, अमरावती

**प्रस्तावना -**

भारतीय संविधान २६ जाने. १९५० पासून अंमलात आणल्या गेले. म्हणजेच गेल्या ६५ ते ६६ वर्षात देशात अनेक स्थित्यतरे आलीत. तसेच अनेक परिणामकारक बदलही देशात अनेक क्षेत्रात घडून आलेत. तेव्हा संविधानाची उपयोगिता व परिणामकारकता याचा आढावा घेण्याकरीता राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने आपल्या निवडणूक जाहीर नाम्यात दिलेल्या आश्वासनाप्रमाणे भारतीय संविधानाची अंमलबजावणी कशी झाली याचा आढावा घेण्याकरिता संविधान पूनर्विलोकन (आढावा) राष्ट्रीय आयोगाची नियुक्ती केली. संविधानात काही बदल करणे आवश्यक आहेत की, नविन तरतुदी करणे आवश्यक आहे. म्हणजेच संविधानाची आजच्या स्थितीबाबत आयोगाचे काय विचार आहेत याकरिता संविधान आढावा राष्ट्रीय आयोगाकडून सुचना व शिफारशी मागविण्यात आल्यात.

**संविधान निर्मात्यांचा दृष्टीकोन -**

संविधान सभेच्या संविधान मसुदा समितीच्या सदस्याने भारताला संघराज्य शासनपध्द्ती योग्य वाटल्याने त्यांनी भारतात संघात्मक व्यवस्था स्विकारली. त्यामुळे संविधान निर्मात्यांना भारतीय संविधान अतिशय लवचीक व एकदम कठोर बनवायचे नव्हते. कारण त्या संविधन संपूर्ण भारतीय नागरीकांच्या आशा, आकांशा, स्वप्न, भावना प्रतिबिंबित होणार होत्या म्हणून त्यांनी संविधान दुरूस्तीची प्रक्रीया बहुतांश परिवर्तनीय व अल्पप्रमाणात परिदृढ अशा स्वरूपाची केली.

संविधान दुरूस्तीसंदर्भात मसुदा समितीचे अध्यक्ष महत्व स्पष्ट करतांना म्हणतात की, "प्रत्येक पिढी हे एक स्वंतत्र राष्ट्र आहे. असे आपण समजावे, प्रत्येक पिढीला बहुमताने स्वतःला बांधून घेण्याचा तेवढा हक्क आहे. दुस-या देशाच्या रहीवाशांवर बंधने लादण्याचा जसा तिला हक्क नाही तसा आपल्यामागून येणाऱ्या पिढीवरदेखील तिला बंधने ठेवण्याचा हक्क नाही. राष्ट्राच्या उपयोगासाठी स्थापन केलेल्या संस्थांना, त्यांचे उदिष्ट् साध्य होण्यासाठी सुध्दा हात लावू नये. अगर त्यांची सुधारणा करू नये. कारण तो अधिकार जनमताचे विश्वस्त या नात्याने संस्थांच्या चालकांना आपोआपच प्राप्त झालेला असतो ही कल्पना राजेशाहीच्या बेबंदपणाला आळा घालण्याच्या दृष्टीने कितीही चांगली असली तरी ती राष्ट्रीय दृष्टीने अत्यंत घातक आहे. असे असूनही आमचे कायदेपंडीत आणि धर्मगुरू त्यांना असे वाटते की, आमच्यापेक्षा पूर्वीच्या पिढयांना पृथ्वीवर जास्त स्वामित्व होते आणि आमच्यावर कायद्याची बंधने लादवयाचा जणू काही त्यांना हक्कच होता, ही बंधने आम्हाला बदलण्याचा अधिकार नाही. पण आमच्या पूवजांप्रमाणे आम्हाला आमच्या वंशजांवर कायद्याची तशीच बंधने लादण्याचा हक्क आहे, ती बंधने आमच्या पुढील पिढयांना बदलता येणार नाहीत. सारांश, या पृथ्वीवर राज्य करण्याचा अधिकार फक्त मृतांना आहे. जिवंत माणसांना नाही."

नंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले की, "घटना परिषदेने या संविधानावर परिपूर्णत्वाचा, अमोधपणाचा किंवा बिनचुकपणाचा शिक्का मारण्याचा मुळीच विचार केला नाही. कारण तसे केले असते तर कॅनडाप्रमाणे संविधान दुरूस्ती करण्याचा जनतेचा हक्क हिरावून घेतला असता अथवा घटना दुरूस्तीच्या बाबतीत अमेरीका किंवा ऑस्ट्रेलियाप्रमाणे लोकविलक्षण

अटी घातल्या असत्या तर तेही अनुश्चित ठरले असते. हे संविधान ज्यांना अमान्य आहे त्यांना जर प्रौढ मतदान पध्दतीने निवडलेल्या सभागृहात दोन तृतियांश बहुमत मिळविता आले नाही तर संविधाना संबंधीचा त्यांचा असंतोष हा सर्वसामान्य जनतेचा आहे असे म्हणता येणार नाही.

"जर नव्या संविधानामुळे स्थिती अधिकच वाईट झाली तर त्याचे कारण आमचे संविधान वाईट नसून, असे म्हणावे लागेल की, माणूसच वाईट आहे."

राष्ट्रपती राजेंद्रप्रसाद म्हणाले होते की, "जर निर्वाचित लोक चारित्र्यसंपन्न, निष्ठावान व योग्य असतील तर ते सदोष संविधानाचा उत्तमप्रकारे उपयोग करू शकतील. परंतू त्यांच्यात या उणिवा असतील तर संविधान देशाला मदत करू शकणार नाही.

**संविधान समीक्षेबाबत शासनाची भुमिका -**

संविधान पुनर्विलोकनाच्या बाबत लालकृष्ण अडवाणी म्हणाले की, एखादया व्यक्तीच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी जशी संपूर्ण वैद्यकिय तपासणी केली जाते तशीच संविधानाला ५० वर्ष पूर्ण झालेली असल्यामुळे समिक्षा केली जाणार आहे. यावर रामजेठमलानी म्हणाले की, संविधानाच्या समिक्षेबाबत शंका घेण्याची काहीही गरज नाही कारण "घटनेच्या पायाभूत चौकटीत बदल सुचविणा-या पुनर्विलोकनाला मान्यता देता येणार नाही व सरकारचा तसा कोणताही उद्देशनाही."

महिलांचे अधिकार, न्यायाधिशांच्या नेमणुका व बडतर्फी कलम ३५६ अंतर्गत राज्यांचे अधिकार, केंद्र-राज्य संबंध, SC/ST यातील भेद दुर करणे, निवडणूक सुधारणा, पक्षांतर विरोधी कायदा याबाबत पुनर्विलोकन करणे आवश्यक आहे असे रामजेठमलानींचे मत होते. १९७३ मधील केशवानंद भारती विरूध्द सर्वोच्छ न्यायालय या खटल्यातील संदर्भ देतांना कलम ३६८ नूसार संविधानाच्या कोणत्याही भागात दुरूस्ती करण्याचा अधिकार संसदेला आहे. परंतू संविधान दुरूस्तीमुळे घटनेच्या मुलभूत पायाला धक्का लावता येणार नाही हे स्पष्ट केले. संविधानातील दुरूस्ती व मुलभूत गाभा नष्ट करणे हया दोन्हीही वेगवेगळया बाबी आहेत.

प्रा. अमर्त्य सेन यांनी संविधान पुनर्विलोकन आयोगाच्या स्थापनेबाबत मत व्यक्त करतांना म्हणतात की, विकासाची संकल्पना ही संपत्तीवर करता येणार नाही. तर लोकांना त्यांचे सामाजिक व आर्थिक लाभ किती मिळाले यावरून विकासाचे मोजमाप करता येणे शक्य आहे. सामाजिक विषमता, दारिद्रय, पिळवणूक, अन्याय, अत्याचार यातून लोकांची अजूनही मुक्तता झ ाली नाही. विकासही झाला नाही आणि खऱ्याअर्थाने लोकशाहीची स्थापना झाली नाही असेच म्हणावे लागेल.

केंद्र-राज्य संबंधाच्या नव्याने विचार केला जावा, निवडणुका, पैसा, गुंडगिरी यांच्यापासून मुक्तता, अनिवासी भारतीयांना दुहेरी नागरीकत्व देण्याबाबत, सुप्रिम कोर्टाकडे वेळ व लागणारा पैसा, सामाजिक सुरक्षा, निवा-याचा हक्क, मुलभूत गरजा न भोगलेले लोक, स्त्रिया, बालके, दलित व आदीवासी यांची सामाजिक अन्यायापासून मुक्तता इत्यादीबाबत पुनर्विलोकन होणे गरजेचे आहे असे अनेक विदवानांनी आपले मत व्यक्त केले होते. तसेच SC/ST आरक्षणाबाबत बदल करण्यावर चर्चा, विधीमंडळ सदस्यांचे वर्तन, राजकारणाचे गुन्हेगारीकरण, भष्ट्राचार, सांप्रदायिकता, धार्मिक असहिष्णुता, गरीब-श्रीमंत यात वाढणारी दरी, लोकसंख्यचेचा स्फोट याचा आढावा घेणे गरजेचे होते.

**संविधान पुनरावलोकन आयोग -**

स्थापना व कार्यपध्दती भारत सरकारचे सर्वोच्छ न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधिश एम.एन.व्यंकटचलैय्या यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यीय संविधान पूनरावलोकन आयोगाची दि. २२ फेब्रुवारी २००० रोजी स्थापना केली. या आयोगामध्ये इतर सदस्य म्हणून पी.पी.जीवनरेड्डी, आर.एस.सरकारीया, सोली सोराबजी, के. पराशरन, कोडापल्ली, पुलैय्या, आबिद हुसैन, सी.आर.ईराणी, सुमित्रा कुलकर्णी, पि.ए.संगमा, सुभाष कश्यप इत्यादी या आयोगाने आपला अहवाल ३१ मार्च २००२ रोजी सरकारला सादर केला. या अहवालातील महत्वपूर्ण भाग निवडणूक सुधारणा व राजकीय पक्षांच्या आचरणासंबंधी आहे. संविधानाचे पुनरावलोकन करणे अधिक सोपे व्हावे म्हणून समितीची दहा उपसमित्यांमध्ये विभागणी केली होती.

**आयोगाच्या शिफारशी –**

**१) निवडणुका विषयक सुधारणा -**

हयासंबंधी आयोगाने ६१ सुचना व शिफारसी केल्यात. त्यात निवडणुक पध्दती सुधारणा, महाग होत जाणारी निवडणुक पध्दत हया सुचना मांडण्यात आल्या.

Review Of Research
Vol. 3 | Issue. 11 | Aug. 2014
Impact Factor : 2.1002 (UIF)
ISSN:-2249-894X Available online at www.ror.isrj.in

**२) संविधानाच्या ३५६ व्या कलमाबाबत -**

कलम ३५६ नूसार देशातील कोणत्याही घटकराज्यात राष्ट्रपती शासन निर्धारित केल्या जाते. परंतू त्यात सुधारणा सुचविली ती अशी की, संसदेची संमती मिळेपर्यंत संबंधीत राज्याची विधानसभा भंग करण्यात येवू नये. तसेच ज्या राज्यावर ३५६ वे कलम लागू केली जाईल त्या राज्यास आपली बाजू मांडण्याची संधी दिली जावी.

**३) लोकपाल -**

आयोगाने लोकपालाच्या नियुक्तीबाबत संविधानातच व्यवस्था करण्याची सुचना केली त्याचप्रमाणे पंतप्रधानाला लोकपाल चौकशीच्या कार्यक्षेत्राधिकाराबाहेर ठेवले आहे.

**४) बहुमताचा निर्णय विधिमंडळातच -**

संविधानाच्या३५६ व्या कलमात दुरूस्ती करून अशी तरतुद केली जावी की, राज्यपाल अथवा राष्ट्रपती हयांनी संबंधीत राज्याच्या विधानसभा विसर्जनाबाबत संसदेत चर्चा झाल्याशिवाय निर्णय घेवू नये परंतू एखादया मुख्यमंत्र्याने बहुमताचा पाठींबा गमावल्यानंतरही जर तो राजीनामा देत नसेल तर राज्यपाल त्याचे सरकार बरखास्त करू शकेल.

**५) राज्यपालाचे संकटकाळातील स्वविवेकाधीन अधिकार -**

घटकराज्यात घटनात्मक पेचप्रसंग निर्माण झाल्यास राज्यपाल अशा सरकारची स्थापना करिल जो पक्ष बहुमत प्राप्त शासन स्थापन करू शकेल. अशी शक्यता नसेल तर राज्यपाल वर्तमान शासनालाच कार्यवाहक सरकार नेमेल.

**६) पंतप्रधान/मुख्यमंत्री यांची सभागृहातच निवड व्हावी -**

लोकसभा किंवा विधानसभेत बहुमताच्या अभावी कोणतेच सरकार स्थापन केले जाणे अशक्य आहे. अशावेळी निर्वाचित सभागृहातील सदस्यांव्दारे पंतप्रधान व मुख्यमंत्र्याची निवड केली जावी.

**७) राजकीय पक्षांची नोंदणी केली जावी -**

राजकीय पक्षांच्या व्यवहारात आर्थिक पारदर्शकता, राजकीय पक्षांनी निवडणूक खर्चाचे, देणग्यांचे नियमन, जाती, वर्ण यांच्या आधारावरील निवडणुकीतील भेदभाव नष्ट करणे, भेदभावाशिवाय नागरीकांना प्रवेश खुला असावा. तसेच देशातील राजकीय पक्षांची नोंदणी करण्याच्या पध्दतीला कायदेशीर स्वरूप देण्याची शिफारस केली आहे.

**८) न्यायव्यवस्थेच्या संदर्भात -**

न्यायविषयक सुधारणा व न्यायाधिशांच्या नियुक्ती संदर्भात राष्ट्रीय न्याय आयोगाच्या स्थापनेची शिफारस केली आहे. त्याप्रमाणे न्यायाधिशांच्या गैरवर्तणुकीबाबत तक्रारी आल्यास त्यावर चौकशीची व्यवस्था करण्यशत यावी असेही सुचविण्यात आले.

**निष्कर्ष -**

वरिल सुधारणा, सुचना, शिफारशी, आयोगाने सरकारला सादर केल्यात. त्यातील शिफारसी योग्य आहेत व काही पुर्वीच संविधानात तरतुद असून त्याला नव्याने काही शब्दांची जोड देण्यात आली आहे. आयोगाने राजकीय पक्ष, निवडणुका, न्यायव्यवस्था याच बाबींवर जास्त भर दिल्याचे दिसते. हया सर्व बाबींचे संकेत चांगले असले तरी आयोगाने सुचविलेल्या शिफारशींची अंमलबजावणी कशा पध्दतीने होईल यावरच ख-याअर्थाने संविधान पुनरावलोकन (आढावा आयोग) चे महत्व सिध्द होईल. त्यामुळे इतर आयोगाबाबत देशात जे घडले तेच याही आयोगाबाबत घडेल असेच म्हणावे लागेल.

**संदर्भ -**

१) भोळे, भा.ल. : भारतीय राज्यव्यवस्था
२) मनोरमा इयर बुक
३) जागरण इयर बुक
४) इंडिया इयर बुक
५) लोकमत, लोकसत्ता, तरूणभारत, सकाळ, भाष्कर
६) जोशी प. ल. : भारतीय संविधान विकास, स्वरूप व राजकारण

७) सोहोनी प. : लोकशाही विक्रेंद्रीकरण
८) त्रिवेदी आर. एन., रॉय, एम.पी. : भारत सरकार एवं राजनीती
९) त्रिवेदी आर. एन., रॉय, एम.पी. : भारतीय राजकीय व्यवस्था